# मुंबई विद्यापीठ

क.वि.नि.वि.वि./१/२०१६.
मुंबई- ४०० ०३२,
७ जून, २०१६

परिपत्रक : -

विषय: **मतदार यादया अद्ययावत करणे व मतदानाची टक्केवारी वाढवणे या साठी महाविद्यालयीन विद्यार्थांचा सहभाग**

संदर्भ: उपसचिव राज्य निवडणूक आयोग यांचे पत्र क.-रानिआ/नप-२०१६/प्र.क. ११/का-६, दिनांक १० मे, २०१६

प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानित/ विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/संस्था, विद्यापीठाचे विविध विभागाचे संचालक व विभागप्रमुख यांना विषयसदंर्भिय कळविण्यात येते की, राज्यातील सुमारे १९५ नगर परिषद/नगर पंचायती, २६ जिल्हा परिषदा, २९६ पंचायत समित्या व १० महानगरपालिकांच्या सार्वत्रिक निवडणूका मार्च २०१७ पूर्वी होणार आहेत.

या निवडणुकांमध्ये विद्यार्थांच्या सहभागने मतदार यादी अद्ययावत व बिनचुक करणे तसेच मतदानाची टक्केवारी वाढवणे यासाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन करुन जनजागृती मोहीम राबविण्याची सुचना सर्व विद्यापीठांचे कुलगुरु, महाविद्यालयाचे प्राचार्य यांना मा. राज्य निवडणुक आयुक्त यांनी दिल्या आहेत असे वरिल संर्दभातील पत्रांन्वये कळविण्यात आले आहे

तरी या संदर्भात पुढील प्रमाणे प्रक्रिया व कार्यकम राबवावे अशी विनंती करण्यात येत आहे.

१) नविन तंत्रज्ञानाच्या मदतीने शास्त्रोक्त पध्दतीने जनजागृती मोहिम राबवावी

२) ज्या विद्यार्थांची दि. १ जानेवारी २०१६ रोजी वयाची १८ वर्षे पूर्ण केली आहेत अशा महाविद्यालयातील सर्व विद्यार्थी /विद्यार्थीनी यांची नावे मतदार यादीत समाविष्ट झाले आहे कि नाही याची खात्री करणे.

३) शक्यतो प्रत्येक महाविद्यालयामध्ये मतदार नोदंणी कार्यालय उघडणे व त्याकरिता नोडल अधिकारी नेमेणे.

४) विद्यार्थ्यांना प्रवेश देताना त्यांचे नाव मतदार यादीत नोंदविले असल्याबाबत खात्री करणे.

५) वर्ष २०१६-१७ स्थानिक लोकशाही दिवस म्हणून साजरा करणे.

६) विद्यापीठ व महाविद्यालयांमार्फत राबविण्यात येणा-या प्रत्येक कार्यक्रमांमध्ये, उदा. कार्यशाळा, सेमिनार, चर्चासत्र, कॉलेज फेस्टिव्हल, खेळ, स्पर्धा इत्यादींमध्ये "लोकशाही बळकटीकरण " ही संकल्पना राबविणे, इत्यादी.

तरी या बाबतीत आपल्या महाविद्यालयातील कार्यक्रमाचा आराखडा तयार करणे व तो विद्यापीठास सादर करावा तसेच वेळोवेळी आयोजीत केलेल्या कार्यकमाचा अहवाल विद्यापीठास सादर करण्यात यावा. तसेच राज्य निवडणुक आयुक्तांच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी किंवा त्यांचा प्रतिनिधी यांनी महाविद्यालयामध्ये संपर्क साधल्यास त्यांना संपुर्ण सहकार्य करावे.

कुलसचिव

प्रति

प्राचार्य, सर्व संलग्नित अनुदानित/ विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित महाविद्यालये/संस्था विद्यापीठाचे विविध विभागाचे संचालक व विभागप्रमुख यांचे माहिती व योग्य त्या कार्यवाहीकरिता रवाना.